

श्री स्वामी समर्थ महाराज


Title Code.: MAHMAR52733

साप्ताहिक

# गावगाथा


संपादक : धोंडप्पा मलकप्पा नंदे मोबा.: ९८५०६१९७२४ # Email: gavgatha@gmail.com

। वर्ष १ ले । अंक १३ वा । शनिवार, दि. १६ डिसेंबर ते २२ डिसेंबर २०२३ । मराठी । साप्ताहिक । सोलापूर । पाने – ४ । किंमत : २ रूपये

I VOL -01 I ISSUE NO. - 13 I Saturday, 16 th December to 22 th December 2023 I MARATHI - WEEKLY - SOLAPUR I PAGES - 4 I PRICE : Rs. 2/-

MARATHI - WEEKLY - SOLAPUR

GAVGATHA


## अयोध्येवरून आलेल्या पवित्र अक्षता मंगल कलशाचे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात मोठ्या जल्लोषात वाजत गाजत स्वागत

अक्कलकोट (प्रतिनिधी) : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी श्रीरामजन्मभुमी अयोध्या येथुन श्रीराम मंदीर निर्माणपूर्तिचे औचित्य साधुन अयोध्येवरून आलेल्या पवित्र अक्षता मंगल कलशाचे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात मोठ्या जल्लोषात वाजत गाजत स्वागत करण्यात आले. अन्नछत्र मंडळाच्या महाप्रसाद गृहात ठेवलेल्या श्रीरामाच्या निर्माणधीन मंदिराची भव्य प्रतिकृती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. दिवसभर हजारो भक्तांनी अन्नछत्र मंडळात पवित्र अक्षता मंगल कलशाचे दर्शन घेतले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या महाप्रसाद गृहात स्वामींच्या मूर्तीजवळ ठेवण्यात आलेल्या पवित्र अक्षता मंगल कलशाचे पूजन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत अयोध्या येथून आलेल्या पवित्र अक्षता मंगल कलश हा शहर व तालुक्यातील सर्व मंदिर व धार्मिक ठिकाणी एक एक दिवस ठेवण्यात येणार आहे. त्या कालावधीत त्या परिसरातील, गावातील रामभक्तांना पवित्र अक्षता मंगल कलशाचे दर्शन घेता येणार आहे. या कलशाच्या पूजन प्रसंगी अन्नछत्र मंडळाचे मुख्य पुरोहित



**श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात पवित्र अक्षता मंगल कलशाचे पूजन न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अभय खोबरे, शामराव मोरे, चेतन जाधव, प्रवीण घाटगे, निखिल पाटील, सौरभ मोरे, बाळासाहेब पोळ आदी.**

अप्पू पुजारी यांनी श्रीरामाचा जयघोष केला.

याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, तालुका कार्यवाह चेतन जाधव, तालुका सहकार्यवाह सुशील हिरस्कर, तालुका प्रचारक यश कुलकर्णी, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा संयोजक संजय जमादार, तालुका सहसंयोजक मदन राठोड, गुंडूअण्णा येळमेली, संतोष वगाले, सायबन्ना सोनकांबळे व एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, सौरभ मोरे, दत्ता माने, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, शरद भोसले, चंद्रकांत हिबारे, संभाजीराव पवार यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

**दिनांक ३१ डिसेंबरपर्यंत या पवित्र अक्षता मंगल कलशाचे शहर व तालुक्यातील मंदिरात रामभक्तांना दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. तसेच एक जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान श्रीरामाची प्रतिमा व पवित्र अक्षता घरोघरी देण्यात येणार आहेत. दि.२२ जानेवारी रोजी घरोघरी पणत्या लावून, रांगोळी काढून, दिवाळीसारखा उत्सव प्रत्येक घरात साजरा करावयाचा आहे. तसेच आपल्या भागात किंवा गावात आल्यानंतर सदर पवित्र कलशाचे दर्शन घेऊन श्री रामाचा आशीर्वाद घ्यावा असे आवाहन श्रीराम जन्मभूमी सेवा समिती,अक्कलकोट यांच्यावतीने करण्यात आलेले आहे.**







# संपादकीय

## नैसर्गिक नदीपण धोक्यात

महाराष्ट्र राज्यातील ५५ नद्यांची खोरी नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत उपस्थित करण्यात आलेल्या लेखी प्रश्नाच्या उत्तरात दिली. राज्यात लहान-मोठ्या मिळून नद्यांची संख्या ४०० च्या आसपास आहे. त्यांपैकी ५५ नद्यांची खोरी नामशेष होत असतील तर ही बाब गंभीर म्हणावी लागेल.राज्यातील बहुतांश नद्या प्रदूषित झाल्या आहेत. नद्यांचे हे प्रदूषण आता पात्राबाहेर पडून संपूर्ण खोरे नामशेष होत आहेत. शुद्ध पाण्याने खळखळ वर्षभर वाहती नदी ही त्या भागासाठीची जीवनदायिनी मानली जाते. नदीची एक स्वतंत्र परिसंस्था असते. पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता आणि नदीकाठच्या परिसरातील सुपीक जमिनीमुळे भटकंती करणाऱ्या मानवांच्या टोळ्या नदीकाठी स्थिरावल्या.

नदीतीरावर खेडी वसली. नदीने माणसे जगवली, पशु-पक्षी, झाडे-झुडुपे जगवली. नदी खोऱ्यातील शेती सुजलाम-सुफलाम केली. पुढे पाण्याच्या उपलब्धतेनुसार उद्योगाची चाकेही नदी भोवती फिरू लागली. पाण्याद्वारे वाहतुकीतून व्यापार-व्यवसाय नदीकाठीच फुलला. त्यामुळेच जगभरातील बहुतांश मोठी शहरे ही नदीकाठीच दिसून येतात. यांस आपला देश आणि राज्यही अपवाद नाही.नदीला नदी मानणाऱ्या युरोपसह अनेक देशांनी नद्या नितळ पाण्याने खळखळत वाहत्या अशा ठेवल्या, तर आपण नदीला माता, गंगा मानणाऱ्यांनी या नद्यांचे लचके तोडायला सुरुवात केली. नदीला अस्वच्छ, प्रदूषित करण्यात आपल्यापैकी कोणीही थोडीशी कसर ठेवलेली नाही. नदीतून शेतीसाठी पाण्याचा अनियंत्रित उपसा सुरू झाला.शहरी भागात नदीपात्रात अनधिकृत अतिक्रमणे वाढली. अनेक ठिकाणी नदीच्या प्रवाहाला अडसर निर्माण केले गेले, काही ठिकाणी ते बदलण्यातही आले. अनियंत्रित वाळूउपशाने नदीचे नैसर्गिक नदीपण आपण गमावून बसलो आहोत. शहरांचे सांडपाणी-मैला, उद्योग व्यवसायाचे दूषित विषारी पाणी, प्लॅस्टिकसह इतरही कचरा सरळसरळ नदीत सोडला जाऊ लागला आणि नद्या गटारगंगा झाल्या.

नद्यांची एकंदरी परिसंस्थाच (खोरे) धोक्यात आली आहे. नदीच्या प्रदूषित पाण्याने भूपृष्ठावरचे, भूगर्भातील जलस्रोत प्रदूषित झाले. त्यामुळे मानवी आरोग्यास हे पाणी घातक ठरत आहे. रसायन तसेच जडधातूयुक्त पाण्याने नदीखोऱ्यातील शेती खराब होत आहे.






# कर्मयोगी संत गाडगे महाराज



महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रुढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खरट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रुढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारुन त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या पप्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवरूषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६७ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

– श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे (९९२२५४६२९५)

# शरीर व मनाने स्वस्थ रहावे !

माणसाच्या जगण्याला व्यापुन उरणारे मन हे त्यांच्या देहात शोधायला गेलो तर ते कधी सापडत नाही.परंतू त्याची सत्ता शेवटच्या श्वासापर्यंत चालत असते.आपले मन जर अस्वस्थ झाले की आपल्याला काही सुचतच नाही.सैरभैर झालेलं मन भलत्याच वाटेला जाऊन आपल्या आयुष्याचे नुकसान करून घेते.

जी माणसं मानसिक दृष्ट्या स्वस्थ व शारीरीक दृष्ट्या निरोगी असतात.अशी माणसे नेहमी आनंदी असतात.त्यासाठी प्रत्येकाने शरीराने आणि मनाने स्वस्थ राहण्याची आवश्यकता आहे.आपण आपले शारीरिक तसेच मानसिक आरोग्य टिकून ठेवण्यासाठी नेहमी दक्ष तसेच तत्पर असलो .तेव्हाच आपले मन प्रसन्न राहील.

मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण असे संतांनी म्हटले आहे.मन आनंदी व सात्विक राहण्यासाठी आपल्या आहाराकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.आपला आहार पुरक चांगला असेल तर आपले शरीर व मन देखील स्वस्थ राहते. यासाठी संतुलित पौष्टिक आहार घ्यावा.नियमित व्यायाम,योगासने करावी.

कमीत कमी आठ तास झोप घ्यावी.आपले विचार नेहमी सकारात्मक ठेवावेत.यामुळे आपल्या मनात उमंग व स्फुर्ती येते.ताणतणाव नैराश्यदेखील दुर करण्यास अत्यंत प्रभावी आहे.जगात सुंदर काय असेल तर ते आपले मन मन खंबीर असले तर माणुस कोणत्याही समस्येला सामोरे जाऊ शकतो.शरीर आणि मन हे दोन्ही महत्वाचे आहे.उत्साही मन आपल्याला नेहमीच चिरतरूण ठेवते.त्यासाठी जिवनात शरीर व मनाने स्वस्थ रहावे!

**– संतोष दत्तू शिंदे**

**(मु.पो.काष्टी,ता.श्रीगोंदा ,**

# शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) :- सोलापूर व धाराशिव या जिल्ह्यातील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेत असलेल्या अनुसचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली असल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर अधिनस्त असलेल्या सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील अनुसचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क (फ्रिशीप) शिष्यवृत्ती योजना, राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्था मधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजनेसाठी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज परिपूर्ण व मूळ कागदपत्रासह भरण्यासाठी खाली दिलेल्या संकेत स्थळाला भेट द्यावी, असे आवाहन प्रकल्प अधिकारी श्री गायकवाड यांनी केले आहे.

संकेतस्थळ – https://mahadbt.maharashtra.gov.in

हे साप्ताहिक वृत्तपत्र मुद्रक धोंडप्पा मलकप्पा नंदे, रा.छुर्रे गल्ली, मु.पो. वागदरी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर-४१३२१८ (महाराष्ट्र)
प्रकाशक धोंडप्पा मलकप्पा नंदे, रा.छुर्रे गल्ली, मु.पो. वागदरी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर-४१३२१८ (महाराष्ट्र) यांनी
मालक धोंडप्पा मलकप्पा नंदे, रा.छुर्रे गल्ली, मु.पो. वागदरी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर-४१३२१८ (महाराष्ट्र) यांच्याकरिता
आदित्य ग्राफिक्स, छुर्रे गल्ली, मु.पो. वागदरी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर-४१३२१८ (महाराष्ट्र) येथे छापून
रा. चुर्रे गल्ली, मु.पो. वागदरी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर-४१३२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. • संपादक : धोंडप्पा मलकप्पा नंदे (मोबा.: ९८५०६१९७२४),

Printed by **DHONDAPPA MALKAPPA NANDE** R/o, Churre Galli, A/p, Wagadari, Tal. Akkalkot, Dist. Solapur (MAH) - 413218
Published by **DHONDAPPA MALKAPPA NANDE** R/o, Churre Galli, A/p, Wagadari, Tal. Akkalkot, Dist. Solapur (MAH) - 413218
on behalf of **DHONDAPPA MALKAPPA NANDE** R/o, Churre Galli, A/p, Wagadari, Tal. Akkalkot, Dist. Solapur (MAH) - 413218
and Printed at **AADITYA GRAPHICS,** Churre Galli, A/p, Wagadari, Tal. Akkalkot, Dist. Solapur (MAH) - 413218
and published from **R/o, Churre Galli, A/p, Wagadari, Tal. Akkalkot, Dist. Solapur (MAH) - 413218**
Editor **DHONDAPPA MALKAPPA NANDE** R/o, Churre Galli, A/p, Wagadari, Tal. Akkalkot, Dist. Solapur (MAH) - 413218 (Cell : 9850619724)

# कोंढापुरी येथे सातवे पर्यावरण संमेलनाचे आयोजन!

अहमदनगर (प्रतिनिधी) : निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे सातवे पर्यावरण संमेलन कोंढापूरी ता.शिरूर जि.पुणे येथे ज्येष्ठ समाजसेवक, पद्मभूषण डॉ. अण्णा हजारे , हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असल्याची माहिती राज्याध्यक्ष प्रमोद मोरे, कार्याध्यक्ष संतोष परदेशी यांनी दिली आहे. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाची चळवळ वृक्षमित्र स्व. आबासाहेब मोरे यांनी संस्थेच्या माध्यमातून समाजसेवक डॉ. अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली४० वर्षापूर्वी करून अनमोल कार्य पर्यावरण क्षेत्रात संस्थेने केले असून आता सातवे राज्य संमेलन पडत आहे.

या सातव्या पर्यावरण संमेलन अध्यक्षपदी हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांची निवड करण्यात आली आहे. तर इतर नामवंत अभ्यासकांच्या उपस्थितीत निसर्ग बदलावर आधारित हवामान अभ्यासाचे अचूकता अनुभवण्यासाठी तसेच नामवंत अभ्यासकांच्या व्याख्यानाचे आयोजन केले जाणार आहे. राज्यभर पर्यावरणावर काम करणाऱ्या व्यक्तीचे अनुभव ऐकण्यास मिळणार आहे.तसेच पर्यावरण मंडळाचे राज्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हाचा सन्मान करण्यात येणार आहे. त्यामुळे संमेलनातील नावनोंदणी लवकर करावी असे पुणे जिल्हा अध्यक्ष मारूती कदम व राज्य कार्याध्यक्ष संतोष परदेशी, जिल्हा संघटक चंद्रकांत भोजने यांनी सांगितले.

हे संमेलन २४,२५ डिसेंबर २०२३रोजी होणार असून आर.एम.धारीवाल सिंहगड मॅनेजमेंट स्कूल कोंढापुरी ता. शिरूर जि.पुणे या ठिकाणी होणार असल्याचे पर्यावरण मंडळाचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे, जिल्हाध्यक्ष मारूती कदम, राज्य कार्याध्यक्ष संतोष परदेशी, जिल्हा संघटक चंद्रकांत भोजने यांनी दिली. मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांनी व पर्यावरण प्रेमींनी उपस्थित राहून उपस्थित या संमेलनाचा लाभ घ्यावा.

# अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे कार्य धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक कार्य प्रेरणा देणारे : अभिनेता स्वप्निल जोशी




अक्कलकोट :(प्रतिनिधी) : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे कार्य धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक कार्य देखील प्रेरणा देणारे असल्याचे मनोगत प्रसिध्द मराठी अभिनेता स्वप्निल जोशी यांनी व्यक्त केले.ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या उपस्थितीत सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, एस.के.स्वामी,सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, सौरभ मोरे, दत्ता माने, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने,महांतेश स्वामी, समर्थ घाटगे,धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, शरद भोसले,चंद्रकांत हिबारे, संभाजीराव पवार यांच्यासह सेवेकरी,कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# जनता विद्यालयात २००१ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न !



अहमदनगर (प्रतिनिधी) : रयत शिक्षण संस्थेचे जनता विद्यालय काष्टी येथे तब्बल २२ वर्षानंतर १०वी२००१ बॅचचा दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न झाला.यावेळी सर्व गुरुजन वर्ग आणि मित्र मैत्रिणींची उपस्थिती होती.यावेळी उपस्थित गुरूजनांनी आनंदी,समाधानी आणि परोपकारी जीवनाचे धडे दिले.प्रत्येक शब्द न शब्द हृदयावर कोरला जावा. इतक्या सहजतेने आणि आपुलकीने सर्व गुरूजनांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आपल्या लाडक्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळया क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांची प्रगती पाहिल्यावरचा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद शब्दात न सांगता येण्यासारखा होता.

आपापल्या क्षेत्रात आणि कामात व्यस्त असणाऱ्या सर्व मित्र मैत्रीणींसाठी हा क्षण प्रचंड आनंद आणि ऊर्जा देणारा ठरला. यावेळी अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य रंगनाथ राजापुरे होते.यावेळी प्रा.सतिष जगताप,अरुण गारूडकर,तात्याबा हिरवे,संपत मेरूकर, बाळासाहेब दिवेकर,सखाराम घोंडगे, नामदेव वाघमारे, सोपान जोगदंड, ज्ञानदेव गायकवाड, भानुदास बनकर, निवृत्ती शेलार, जनता कन्या विद्यालयाच्या प्राचार्या सौ.मंगल जोगदंड, शिक्षक यावेळी उपस्थित होते.

यावेळी २००१ दहावीच्या मुली आणि मुलांची उपस्थिती लक्षणीय होती.यावेळी सर्वच विद्यार्थ्यांनी स्नेहमेळावा आयोजित करण्यासाठी मेहनत घेतली यावेळी सर्वच उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते.

# नाविंदगी गावात ग्रामपंचायत,मराठी व कन्नड जिल्हा परिषद शाळासह ग्रामस्थांनी केला गावगाथा दिवाळी अंकाचे स्वागत




नाविंदगी (प्रतिनिधी) : नाविंदगी तालुका अक्कलकोट येथील सरपंच पंडीत चव्हाण, – राजेंद्र गोडगाव, यल्लाप्पा तलवार, सुरेश रामपुरे, माळप्पा पुजारी, आपशा व्हनमाने, इरना ढवणे,सिद्धाराम हाळतोट.चंद्रकांत हंगरगी पोलीस पाटील,सिद्धाराम हाळतोट, यल्लाप्पा तलवार, हुल्ले सर, बंडगर सर, वाडेद सर, राजेंद्र गोडगाव, अपाशा व्हनमाने आदी मान्यवर उपस्थित होते.




साप्ताहिक
गावगाथा
पोर्टल
आपल्या परिसरातील बातम्या,
शुभेच्छा, जाहिरात, छोट्या जाहिराती
व इतर जाहिरात प्रसिध्दी करण्यासाठी
संपर्क
धोंडप्पा नंदे
9850619724,9665169724
E-mail ID - gavatha@gmail.com
Website - www.gaongatha.com

# धोंडपा नंदे यांच्या मुळे गावाशी तुटलेली नाळ या गावगाथाच्या माध्यमातून पुन्हा एकदा मजबूत झाली..

आजच्या युगात ज्याची परिस्थिती बेताची आहे ती लोक आहे त्या नोकरीत तुटपुंज्या पगारात स्वतःची आणि परिवाराची गरज भागवण्यासाठी दिवस काढत असतात... पण या सगळ्यात एका व्यक्तीचं व्यक्तिमत्व मला भावलं ते म्हणजे वागदरीचे धोंडाप्पा नंदे सर...परिस्थिती बेताची तुटपुंजी पगार यात कुटुंबाच्या गरजा भागवून...या सगळ्यातून वेळ काढून अक्कलकोट घडामोडीसारखे व्यासपीठ निर्माण केले...या अक्कलकोट घडामोडीच्या माध्यमातून अनेक लोकांच्या अडचणी,अनेक सामान्य लोकांचे प्रश्न,न सुटणारे प्रश्न या घडामोडीच्या माध्यमातून मार्गी लागले...याचे श्रेय जाते ते धोंडाप्पा नंदे सरांना...त्याचं कारण असं २०२० आली पावसाळ्याच्या दिवसात अचानक कुरनूर धरण ओव्हरफ्लो झाले...याचा फटका कुरनूर धरण आणि आसपासच्या गावातील नागरिकांना त्या भागातील शेतकऱ्यांना आणि वस्तीवर राहणाऱ्या लोकांना बसणार होता...या घटनेची माहिती प्रत्येकाला फोन करून देणे शक्य नव्हतं...त्यावेळी हे काम सोपं झालं हे फक्त



अक्कलकोट घडामोडी आणि धोंडप्पा नंदेसर यांच्यामुळे...आता सध्याचा ज्वलंत विषय म्हणजे त्यांनी लिहिलेली गावगाथा...या गावगाथा काव्यसंग्रहात त्यांनी अक्कलकोट तालुक्यातील अनेक गावातील यात्रा देवस्थान आणि जुन्या रूढी परंपरा या सर्वांचे व्यवस्थितपणे मांडणी केली आहे... या सगळ्यांचे वाचन झाल्यानंतर जी लोकं कामानिमित्त मुंबई पुणे सारख्या ठिकाणी राहतात त्या लोकांची गावाशी तुटलेली नाळ या गावगाथाच्या माध्यमातून पुन्हा एकदा मजबूत झाली...आणि जी नवीन पिढी या सगळ्या गोष्टी विसरत चालली होती त्यांना या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून आपल्या जुने रूढी परंपरा नव्याने शिकावयास मिळाल्या... त्यांच्या या सगळ्या गोष्टी पाहिल्यानंतर या माणसाचा वैचारिक पाया किती मजबूत आहे हे दिसून येते...आणि मला विशेष आनंद वाटते की या गोष्टीचा हा माणूस वैचारिक फक्त बोलत नाही तर तो वैचारिक जगतो...नंदे सर तुमच्या भावी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा...

**– अमोल काळे कुरनूर (९९२३४०९०३२)**

# सोलापुरातील 'या झेडपी शाळेच्या मुख्याध्यापकाने पदरमोड करून दिला विद्यार्थ्यांना चांगला गणवेश व बूट

## दरवर्षीप्रमाणे विमानातून सहलही घडवून आणणार



सोलापूर : अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी जिल्हा परिषद कन्नड मुली शाळेच्या मुख्याध्यापकाने पदरमोड करीत व शिक्षण समितीच्या सहकार्याने शाळेतील मुलींना ब्रँडेड कंपनीच्या कापडाचा गणवेश व दर्जेदार कंपनीचा बूट उपलब्ध करून दिला आहे.

जिल्हा परिषद मैंदर्गी कन्नड मुली शाळेत एकूण २५८ पटसंख्या असून त्या सर्व मुलींना शासनाकडून एक जोड बूट दोन जोड सॉक्ससाठी पैसे मंजूर झाले होते. पहिली ते सातवीतील प्रत्येक विद्यार्थिनींना १७० रुपयाप्रमाणे एक जोड बूट व दोन जोड सॉक्ससाठी ४३ हजार ६९० रुपये मंजूर झाले होते. परंतु १७० रुपयांमध्ये एक जोड बूट दोन जोड सॉक्स उत्तम दर्जाचे खरेदी होत नसल्याने शाळा व्यवस्थापन समितीने त्याचा विचार करून लोकवर्गणी गोळा केली. त्या लोकवर्गणीतून पहिली ते सातवी मुलीना ७९ रुपयापासून ३७९ रुपये पर्यंतचे बूट खरेदी करण्यात आले. मैंदर्गी गावचे प्रतिष्ठित नागरिक माजी नगराध्यक्ष तुकप्पा नागोर आणि शिक्षण विस्तार अधिकारी दयानंद कवडे, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश पाटील, मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांच्या उपस्थितीत मुलींना बूट व सॉक्स वाटप करण्यात आले. उत्तम दर्जाचे बूट दिल्याने मुलीमध्ये व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश पाटील यांनी मुलींना चांगल्या कंपनीचे बुट उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तुकप्पा नागोर यांनी शाळेचे मुख्याध्यापक महांतेश कट्टीमनी उत्तम रीतीने कामकाज करीत आहेत शासनाने गणवेशासाठी मंजूर केलेल्या निधीपेक्षा पदर मोड करून ब्रॅण्डेड कंपनीचा गणवेश उपलब्ध करून दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला. शिक्षण विस्तार अधिकारी दयानंद कवडे यांनी मुख्याध्यापक कट्टीमनी यांच्या कामाला तोड नाही असे कौतुक केले. आभार व्यक्त करताना मुख्याध्यापक कट्टीमनी यांनी यंदाही मुलींना विमान सफर करणार असल्याचे सांगितले.

# अक्कलकोट तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत हंजगी आश्रम शाळेने मारली बाजी

सोलापूर जिल्हा क्रीडा महोत्सव अंतर्गत इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने कोन्हाळी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आला होता.या क्रीडा स्पर्धेत हंजगी आश्रम शाळेने घवघवीत यश संपादन करीत स्पर्धेत बाजी मारली आहे.या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे

**अंतिम निकाल :** पहिली ते पाचवी लंगडी प्रथम क्रमांक वाल्मिकी बालक प्राथमिक आश्रम शाळा संघ विजय.

५० मीटर धावणे अंतिम निकाल : पहिली ते तिसरी मुला मध्ये राजवीर उदय चव्हाण तर मुली मध्ये ऐश्वर्या सिद्धाराम माणके द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक मनहा सैपन बिराजदार विजय.

**८० मीटर धावणे :** मुला मध्ये सिद्धाराम संगमेश कोळी तर मुली मध्ये कोमल शशिकांत धुते प्रथम क्रमांक विजय.

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे चेअरमन आनंदराव जाधव,मुख्याध्यापक, मार्गदर्शक शिक्षक आदींनी पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करुन अभिनंदन केले.




# सा.गावगाथा मुंबई विशेष प्रतिनिधी पदी गणेश हिरवे यांची निवड

मुंबई – साप्ताहिक गावगाथा च्या मुंबई जिल्हा विशेष प्रतिनिधी पदी मुंबई येथील साहित्यिक लेखक सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांची निवड करण्यात आलं आहे.गणेश हिरवे गेल्या अनेक वर्षांपासून वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत आहेत.विविध विषयावर सातत्याने लेखन करत असून त्यांना अनेक संस्था व संघटना कडून समाजसेवा व पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पुरस्कार देऊन



गौरविण्यात आले आहे.हिरवे यांचा साप्ताहिक गावगाथा चे मुख्य संपादक धोंडपा नंदे यांनी अभिनंदन केले आहे




टाटा पॉवर आणि अगस्त्या फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिल्ली येथे संपन्न होत असलेल्या राष्ट्रीय ऊर्जा मेला २०२३ या विज्ञान प्रदर्शनात श्री एस एस शेळके प्रशाला वागदरी येथील इयत्ता आठवी मधील पवन शिवपुत्र चोळ्ळे व शुभम शिवानंद हुलगेरी यांनी तयार केलेल्या सोलर ट्रेकिंग सिस्टीम या वैज्ञानिक उपकरणाची दखल भारत सरकारच्या दूरदर्शन या चॅनलने घेतली आहे. सदर माहितीचे प्रक्षेपण सोमवारी सकाळी आठ ते नऊ या वेळेत डीडी नेशनल वर आणी नऊ ते दहा डीडी भारती वर याचे प्रक्षेपण होणार आहे.




काशिरायाकाका पाटील विद्यालय अक्कलकोट येथे व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. प्रमुख अतिथी ना गावागाथा दिवाळी अंक सत्काराप्रसंगी भेट म्हणून दिले. धन्यवाद समीर मणियार सर,..